महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित

# लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

पंचवटी नाशिक - ४२२००३

पुणे विद्यापीठ संलग्न क्र पी.यू./एन.एस/ए.एस.सी/०१८(१९७९)

(NAAC Reaccredited at **'A'** Level with CGPA 3.01)

कार्यालय: २५१२९५४ , २६२८२३३ फैक्स ( २५३) २५१२९२४

Web site : www.lvhcollege.com * E-mail: lvhcollege@gmail.com,

उत्कृष्ट संलग्न महाविद्यालय पुरस्कार २०१७, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Founder



Karmaveer Bhausaheb Hiray

## ग्रंथालय वार्षिक अहवाल

दिनांक ३०/०३/२०१६

"बहुजन हिताय बहुजन सुखाय" हे ब्रीद घेऊन बहुजनांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कठीबद्ध असलेली नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणजे महात्मा गांधी विद्यामंदिर होय. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक गरजा लक्षात घेऊन संस्कृती विषयक विचार कसे प्रगल्भ होतील याकडे विषेश लक्ष दिले जाते. या सर्वांचा विचार करून महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग चैतन्यशील आणि तेजस्वी ठेवण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील असतो. माहिती तंत्रज्ञानातील विकास व माहितीचा विस्फोट यांना सामावून घेत ग्रंथालयांना टिकून राहायचे आहे. आणि भविष्यात होणाऱ्या बद्दला कडे वाटचाल करायची आहे. यासाठी ग्रंथालय कसे सुसज्ज आणि परिपूर्ण होईल याकडे जास्तीत जास्त लक्ष दिले जाते. त्यासाठी दर्जेदार वाचन साहित्य संदर्भग्रंथ, शब्दकोश, ज्ञानकोश, विविध स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ग्रंथ व नियतकालिके खरेदी केली जातात गेल्या ४५ वर्षापासून ग्रंथालय ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. या पवित्र कार्य करणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयाचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे. स्थापनेपासून ते आज घडीला ग्रंथालयात खालील प्रमाणे ग्रंथसंख्या उपलब्द आहे.

| अ.नं. | विवरण | मागील ग्रंथांची संख्या | चालू वर्षातील वाढ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विकत घेतलेली ग्रंथ | | | |
| | १.वरिष्ठ विभाग | ४५१८७ | ११२८ | ४६३१४ |
| | २. वरिष्ठ पी.बी.एफ. | ५९९३ | ४३८ | ६४३१ |
| | ३.कनिष्ठ विभाग | १२९२५ | ०४ | १२९२९ |
| | ४. कनिष्ठ पी.बी.एफ.. | ४२९५ | ०० | ४२८५ |
| | ५.व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | १०७०१ | ०० | १०७०१ |
| | ग्रंथसंख्या | **७९१०१** | **१५७०** | **८०६७१** |
| २ | प्रबंध व लघुप्रबंध | ०४ | - | ०४ |
| ३ | नियतकालिकांचे बांधीव खंड | ५५७ | - | ५५७ |
| ४ | सीडी व डीव्हीडी | २६३ | - | २६३ |
| | एकूण | **८२४** | **-** | **८२४** |
| ५ | रद्दबातल ग्रंथसंख्या<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी.बी.एफ.<br>३. कनिष्ठ विभाग<br>४. कनिष्ठ पी.बी.एफ..<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ | <br>-<br>-<br>-<br>-<br>- | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ |
| ६ | इतर (बुक बँक/ गुणवत्ता विकास / कनिष्ठ एस. अे. एफ./ वरिष्ठ एस. अे. एफ./ एम. एस.डब्लू / | | - | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | के.बी.एच.इजिनि./ व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन कोर्स ) | ६४५५ | - | ६४५५ |
| | एकूण | **१८४०९** | **-** | **१८४०९** |
| ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथांची संख्या | | **६२२६२** | | |
| ७ | नियतकालिके<br>१. वर्गणीतून खरेदी केलेली<br>२.ई-जर्नल्स<br>३. ई-बुक्स | १०२<br>२१००<br>५१००० | ०३<br>३९००<br>४६००० | १०५<br>६०००<br>९७००० |
| | | | | |

ग्रंथालयातील सभासद संख्या

| अ.नं. | ग्रंथालयातील सभासद संख्या | विद्यार्थी | शिक्षक | |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | ३७३७ | ४५ | |
| २ | कनिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | १९१५ | २८ | |
| ३ | व्यवसाय शिक्षण विभाग | २२८ | ०७ | |
| ४ | शिक्षकेत्तर कार्मचारी | | ५७ | |
| | **ग्रंथालयातील एकूण सभासद संख्या** | ५८८० | १३७ | **६०१७** |

**माहिती साक्षरतेचा उपक्रम :** सद्याचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. मनुष्याच्या जीवनात माहितीला अनन्य साधारण महत्व आहे. आज ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे वाचन साहित्याची मोठया प्रमाणावर निर्मिती होत आहे. विध्यार्थ्यांना आपल्या क्षेत्रातील नवीन ज्ञान प्राप्त करणे आवश्यक असते. त्यासाठी विद्यार्थी माहिती साक्षर असणे आवश्यक आहे. त्या उद्देशाने महाविध्यालायाचा विद्यार्थी माहिती साक्षर व्हावा यासाठी ग्रंथालयात मुक्त (free) इन्टरनेट सेवा कार्यरत आहे.

**इंटरनेट सेवा :** ग्रंथालय विभागात १५ संगणकासह इंटरनेट सुविधा असलेली सुसज्ज प्रयोगशाळा ई-रिसोर्स च्या वापरासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधक व प्राध्यापक लाभ घेतात. **पी.बी.एफ.:** आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विध्यार्थ्यांसाठी ग्रंथपेढी पी.बी.एफ. या योजने अंतर्गत ८४६४५.०० रू. किमतीचे सुमारे ४३८ ग्रंथ खरेदी करण्यात आले. या योजनेतील ८० विध्यार्थ्यांना २५७ पुस्तके वर्षभर घरी अभ्यासासाठी देण्यात आली.

**स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र** : महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातून शैक्षणिक वर्षात स्पर्धा परीक्षेची ३३६ पुस्तके विध्यार्थ्यांना वर्षभरासाठी पुस्तके देण्यात आली. १११ विध्यार्थ्यानी त्याचा लाभ घेतला.

**नियतकालिके :** विविध विषयावरील ग्रंथसंख्या हे जसे ग्रंथालयातील महत्वाचे अंग आहे. त्याच प्रमाणे नियातकालिके सुद्धा ग्रंथालायाचे महत्वाचे अंग आहे. नियातकालीके हा ताज्या माहितीचा प्रवाह असतो. त्यामध्ये आद्ययावत माहिती मिळते. ही माहिती आमच्या विद्यार्थी व शिक्षकांना मिळावी म्हणून ग्रंथालयात वेगवेगळया विषयावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील एकूण १०१ नियतकालिके आणि जर्नल्स खरेदी केली जातात. शैक्षणिक वर्षात ६००० ऑनलाई न ई-जर्नल्स आणि ९७००० ई-बुक्स चे दरवर्षी नूतनीकरण करून ग्रंथालय सभासदांना उपलब्द करून देण्यात येते. प्रिंट आणि ई-जर्नल्स आणि ई-बुक्स ई. करिता वार्षिक वर्गणी पाठवली जाते.

**दैनिक :** शिक्षक व विद्यार्थी यांना दररोजच्या घडामोडीची माहिती मिळावी या करिता मराठी, इंग्रजी आणि हिदी भाषेतील २० दैनिक वर्तमान पेपर ग्रंथालय विभागात उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी दरमहा रु. २५०० (दोन हजार पाचशे रुपये) एवढा खर्च केला जातो.

**झेरॉक्स सेवा** : संशोधक विद्यार्थी व महाविध्यालयीन कर्मचारी यांच्या मागणी नुसार ग्रंथ तसेच नियतकालिकातील मजकूराच्या प्रतिलिपी काढून दिल्या जातात.

**कात्रण सेवा** : महाविद्यालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी महाविद्यालय ग्रंथालयाने विविध दैनिकातून महाविद्यालया संबधी येणाऱ्या बातम्यांचे कात्रण सर्वांसाठी वाचावयास उपलब्ध करून दिले आहे.

**फेसबुक सेवा / वाट्सअप** : सोशल नेट्वर्किंग च्या माध्यमातून महाविद्यालात विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित केली जातात. त्या सर्व उपक्रमाची माहिती व माहितीविषयक बातमी महाविद्यालायाच्या सोशल नेट्वर्किंग च्या माध्यमातून फेसबुकवर आणि **वाट्सअप वर** अपलोड केली जाते. जेणेकरून महाविद्यायालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा :** महाविद्यालायातील विद्यार्थी व प्राध्यापकांना आपल्या विषयासंबधी पुस्तक ग्रंथालयात उपलब्द नसेल अशा वेळी खालील ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यात आले आहे.

१. डेलनेट (डेव्हलोपिंग लायब्ररी नेटवर्क ) चे सभासद, दिल्ली.

२. महात्मा गांधी विद्यामंदीर फार्मसी महाविद्यालय, नाशिक

३. महात्मा गांधी विद्यामंदीर मैनेजमेंट इन्स्टिठयुट, मुंबई आग्रा रोड पंचवटी नाशिक

**ग्रंथालयाची सुरक्षितता** : ग्रंथालय विभागतील साहित्य सुरकक्षेच्या दृष्टीने ग्रंथालय बिभागाचा ६२००००० रू. बासस्ट लाख( बासस्ट लाख रुपये) चा विमाचे नूतनीकरण करण्यासाठी वार्षिक प्रीमियम ३००० रू. खर्च करण्यात आली.

**समाज कल्याण विभाग :** जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक यांच्या मार्फत महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षात अनुसूचित जातीच्या ९२ विद्यार्थ्यांना लोकराज्य मासिकाचे दर महा मोफत वितरण करण्यात आले.

उद्देश :१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या योजनांची प्रसिद्धी व्हावी.

२) अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगार विद्यार्थ्यांना ( युवकांना) स्पर्धा परीक्षेसाठी लोकराज्य मासिकाचे मोफत वितरण.

**आभार :** महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातील सेवा व सुविधा समृद्ध व अद्ययावत करण्यासाठी संस्थेचे विशवस्त व अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. बापूसाहेब जगदाळे व ग्रंथालय समितीचे सदस्य व माझे सर्व सहकारी आणि विद्यार्थी यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्याने ग्रंथालयाची प्रगती होत आहे. मनापासून सर्वांचे आभार व्यक्त करतो.

Achievements:

Mr. Sambhaji P. Vyalij

1) Participated in the International Conference on Emerging Trends and Issues in Research & Development (ETIRD-2016) by contributing the paper entitled, 'E-Learning' at MGV's Maharaja Sayajirao Gaikwad Arts, Science & Commerce College, Malegaon Camp from 17th to 18th February 2016 .
2) Presented research paper entitled, " Information Literacy" in State level conference on Emerging Trends and Innovations in Academic Library Services held at S.N.J.B's Karmavir K.H. Abad Art, Shriman M.G. Lodha Commerce and Science College, Chandwad on 25th and 26th September 2016.
3) Participated in the 103rd Indian Science Congress held at University of Mysore, Mysuru from January 3 to 7, 2016.
4) Attended and Presented paper entitled, **"N-LIST"** in State level conference on Currents trends in Academic Librarianship held Smt. Vimlaben Khimji Tejookaya Arts Science and Commerce College, Nashik on 19th January 2016.

ग्रंथालय समिती

| | |
|---|---|
| १.प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे | अध्यक्ष |
| २.उपप्राचार्या डॉ.एम. अे. भारद्वाज | सदस्य |
| ३.डॉ. आर.पी भामरे | सदस्य |
| ४.डॉ. एन.बी.पवार | सदस्य |
| ५.डॉ. एस. एम. पवार | सदस्य |
| ५.डॉ. लिना पांढरे | सदस्य |
| ६.प्रा. एस. पी. व्याळीज | सचिव |
| ७.कुमार गणेश वसंत सानप | विद्यार्थी प्रतिनिधी |



महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची पटपडताळणी समितीचे शासनाचे प्रतिनिधी मा. डॉ. गांधी सर यांनी ग्रंथालय विभागाला भेट दिली. त्याच्या समवेत प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, ग्रंथपाल प्रा. संभाजी व्याळीज. समवेत डॉ. महाले आर.टी. श्री मनोहर कदम.



“वाचन प्रेरणा” दिनाचे औचित्य साधून मा. प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी ग्रंथालय विभागाला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे लिखित साहित्य अग्निपंख या पुस्तकांच्या १० प्रती ग्रंथालय विभागाला भेट दिल्या व त्या स्वीकारतांना ग्रंथपाल प्रा. संभाजी व्याळीज. समवेत उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, प्रा.राजाराम जाधव आणि प्राध्यापिका दिपाली चंद्रमोरे.



ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथन यांची १२४ जयंती साजरी, प्रतिमेचे पूजन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य व उच्च शिक्षण समन्वयक बापूसाहेब जगदाळे समवेत ग्रंथपाल प्रा. संभाजी व्याळीज , डॉ. अरुण बच्छाव.



**<u>फोटो कॅप्शन</u>** : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसाचे उद्घाटन प्रसंगी विद्यार्थी आणि विध्यार्थिनीना पुस्तकाचं वाटप करताना प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे समवेत उपप्राचार्या मृणाल भारद्वाज, ग्रंथपाल प्रा. एस. पी व्याळीज, एन. एस. एस. कर्यक्रम अधिकारी प्रा.राजाराम जाधव व विद्यार्थी प्रतिनिधी गणेश सानप.



लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात विद्यार्थ्यांना पुंस्तकभेट देताना ग्रंथपाल प्रा. एस. पी.व्याळीज व विद्यार्थी.

---

## प्रसिद्धी समिती :

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रसिद्धी समितीने महाविद्यालया संदर्भात वर्ष भरात झालेल्या विविध उपक्रमांच्या बातम्या विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्धी दिली. असुन त्या संदर्भातील काही बातम्या आपल्या अवलोकनार्थ जोडलेल्या आहेत.

प्रा. एस .पी. व्याळीज



लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात महिला दिन

राज्य नेमबाजीत पंचवटी महाविद्यालयास सुवर्णपदक

कठोर परिश्रमातून मिळवा कौशल्य...

हिरे महाविद्यालयात भाऊसाहेब हिरे यांची जयंती साजरी

State level seminar held at LVH College

Godown for RENT

# विविध वेशभूषेतून एकतेचा संदेश



# हिरे महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती

नाशिक, दि. १३ (प्रतिनिधी)- ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्मदिन १२ ऑगस्ट रोजी संपूर्ण भारतभर ग्रंथपाल दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून हिरे महाविद्यालयाचे प्राचार्य व उच्च शिक्षण समन्वयक डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी या थोर पुरुषाविषयी विचार व्यक्त केले. ग्रंथालय शास्त्राच्या चळवळीचे खूप मोठे योगदान ग्रंथालय शास्त्राच्या विकासासाठी त्यांनी दिले. या दिनाचे औचित्य साधून ग्रंथालयातील सर्व सेवकांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. एस.पी. [illegible], उपग्रंथपाल एस. पी. कदम व ग्रंथालय कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी उपस्थित होते.



# 'बेटी बचाव'चा जागर करा : देसाई

हिरे महाविद्यालयात कार्यक्रम



# लोकशाही बळकटीकरणासाठी राज्यघटनेचा आदर महत्त्वाचा

जिल्हाधिकारी : मतदार दिनानिमित्त साधला संवाद





# भाषेवर प्रभुत्व मिळविणे आवश्यक

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

'आजच्या काळात भाषेवर प्रभुत्व मिळविणे आवश्यक असून, स्थानिक ते जागतिक स्तरावर कार्यरत राहण्यासाठी भाषांचीच मदत आपल्याला होत असते. विविध भाषांचे ज्ञान असेल तरी प्रगतीमध्येही कोणतेही अडथळे येत नाही', असे प्रतिपादन गझलकार व पत्रकार प्रदीप निफाडकर यांनी केले.

**प्रदीप निफाडकर यांचे प्रतिपादन**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कॉलेजमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' अंतर्गत 'संवाद कौशल्य व प्रसार माध्यमे' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी ते बोलत होते.

निफाडकर म्हणाले, 'प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना एखादी गोष्ट लवकर समजण्यासाठी कवितेचा आधार घेतला पाहिजे. कवितेतून शिकविलेला विषय आकर्षक वाटत असल्याने तो विद्यार्थ्यांपर्यंत लवकर पोहोचतो.' गझल ही दोनच ओळीत मांडायची असते. पहिल्या ओळीत प्रस्तावना आणि दुसऱ्या ओळीत सार याप्रमाणे गझलची रचना असल्याने ती खूप लक्षवेधक आणि लोकप्रिय असते, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांनी या कार्यक्रमासाठी विविध कॉलेजमधून आलेल्या साहित्य विषयातील प्राध्यापकांचे स्वागत केले. 'ज्या प्राध्यापकांना तीनही भाषांचे ज्ञान अवगत आहे, त्यांना अध्यापनासाठी कोणतीही अडचण येत नाही,' असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना भाषा समृद्ध करण्यासाठी शिक्षकांनी भाषांवर लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन जगदाळे यांनी यावेळी केले. शहरातील विविध कॉलेजमधील साहित्य क्षेत्रातील प्राध्यापकांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे समन्वयक डॉ. किरण पिंगळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. [illegible] यांनी तर आभार उपप्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज यांनी मानले.

# हिरे महाविद्यालयात फॅकल्टी डेव्हलपमेंट

नाशिक : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ-विद्या प्रबोधिनी अंतर्गत 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' २८ ते ०३ ऑक्टोबर १५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला आहे. प्रस्तुत शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम भाषा विषयातील प्राध्यापकांसाठी 'संवाद कौशल्ये व प्रसारमाध्यमे' या विषयावर आहे. राज्यातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयातील सुमारे ८० प्राध्यापकांनी त्यासाठी नोंदणी केलेली आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन गझलकार व पत्रकार प्रदीप निफाडकर यांच्या हस्ते होत आहे. अध्यक्षस्थान शिक्षक आमदार व महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे भूषविणार आहेत.

सदर शैक्षणिक उपक्रमात श्रीमंत माने, विश्वास देवकर, डॉ. अंकुश यांदल, प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे, प्राचार्य डॉ. आर. के. देवरे, डॉ. वृंदा भार्गवे, डॉ. बाळासाहेब गुंजाळ, भूषण मटकरी, डॉ. शोभा राणे, उर्दू गझलकार, नासीर शाकेब, डॉ. मृणाल भारद्वाज, डॉ. आर. पी. भामरे, डॉ. लीना पांढरे हे तज्ज्ञ व्याख्याते मार्गदर्शन करणार आहेत.

सदर कार्यक्रमासाठी सामाजिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे व समन्वयक प्रा. डॉ. किरण पिंगळे यांनी केले आहे.